मंगळवार दि. १४ जुलै २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ३१३ वा ● किंमत २ रु. ● पाने ०४
8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886




https://yuvaadarsh.com
युवा आदर्श
संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके
https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

# जालना महापालिकेची विशेष सर्वसाधारण सभा आज

## विविध विकासकामांवर होणार महत्त्वपूर्ण निर्णय ; सभेचे प्रथमच अधिकृत युट्यूबवर थेट प्रक्षेपण; क्यूआर कोड व लाईव्ह लिंकद्वारे सहभागाचे आवाहन

**जालना -प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिकेची विशेष सर्वसाधारण सभा मंगळवार, दि. १४ जुलै रोजी सकाळी ११ वाजता महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीतील भारतरत्न अटलबिहारी वाजपेयी सभागृह येथे आयोजित करण्यात आली असून, शहराच्या विकासाशी संबंधित विविध महत्त्वाच्या विषयांवर या बैठकीत चर्चा होणार आहे. विविध नागरी समस्या, विकासकामे, लोककल्याणकारी योजना तसेच प्रशासकीय विषयांवर सविस्तर विचारविनिमय करून महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जाण्याची शक्यता आहे.

महापौर श्रीमती वंदना अरुण मगरे यांच्या कार्यालयाकडून जारी करण्यात आलेल्या प्रसिद्धीपत्रकानुसार, शहरातील नागरिकांना महानगरपालिकेच्या कामकाजाची माहिती पारदर्शकपणे उपलब्ध व्हावी आणि लोकशाही प्रक्रियेत अधिकाधिक सहभाग वाढावा, या उद्देशाने या विशेष सर्वसाधारण सभेचे थेट डिजिटल प्रक्षेपण ( ) करण्यात येणार आहे. महापालिकेच्या अधिकृत युट्यूब चॅनेलवर ही संपूर्ण सभा थेट प्रसारित केली जाणार असून, नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार तसेच विविध क्षेत्रातील प्रतिनिधींना सभेतील चर्चा आणि निर्णय घरबसल्या पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे.

यासाठी महापालिका प्रशासनाने विशेष  देखील जारी केला असून, तो स्कॅन करून अथवा खालील अधिकृत लाईव्ह लिंकद्वारे नागरिक थेट सभेशी जोडले जाऊ शकतात.

थेट प्रक्षेपणासाठी अधिकृत लिंक :

https://youtube.com/live/iPbmgHxOztM?feature=share

महापौर श्रीमती वंदना अरुण मगरे यांनी शहरातील सर्व नागरिक आणि प्रसारमाध्यमांना या उपक्रमाला व्यापक प्रसिद्धी देण्याचे आवाहन केले आहे. महानगरपालिकेच्या कामकाजात पारदर्शकता, उत्तरदायित्व आणि नागरिकांचा सहभाग वाढविण्याच्या दृष्टीने हा महत्त्वपूर्ण उपक्रम असल्याचे त्यांनी नमूद केले आहे.

दरम्यान, या विशेष सर्वसाधारण सभेत शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता, रस्ते, विकासकामे, विविध प्रशासकीय प्रस्ताव तसेच लोकहिताच्या विषयांवर चर्चा होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात असून, सभेत होणाऱ्या निर्णयांकडे संपूर्ण शहराचे लक्ष लागले आहे.

## जालना महापालिकेच्या स्थायी समितीत २८ विषयांवर चर्चा; फायर सेफ्टी ऑडिट, व्यापारी संकुल, पाणीपुरवठा, डॉग हाऊससह अनेक प्रस्तावांना दिशा

*✻मंठा चौफुली व्यापारी संकुलाचे गाळे पुढील आठवड्यात ताब्यात*

*✻स्ट्रीट लाईट, पाईपलाईन दुरुस्ती, पुतळ्यांचे सुशोभीकरण, भाजी मंडई स्थलांतराचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे*





**जालना - प्रतिनिधी**

जालना शहर महानगरपालिकेच्या स्थायी समितीची सभा सोमवारी (दि. १३) सकाळी ११ वाजता महापालिकेच्या मुख्यालयातील भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी सभागृह येथे स्थायी समितीचे सभापती अशोक उर्फ लक्ष्मीकांत मनोहर पांगारकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. बैठकीत शहर विकास, नागरी सुविधा, महसूल, पायाभूत सुविधा, अग्निसुरक्षा, स्वच्छता आणि प्रशासनाशी संबंधित तब्बल २८ विषयांवर सविस्तर चर्चा करून विविध निर्णय घेण्यात आले.

सभेच्या सुरुवातीला दि. ११ मे २०२६ रोजी झालेल्या स्थायी समितीच्या बैठकीचे इतिवृत्त सर्वानुमते मंजूर करण्यात आले. त्यानंतर जालना महानगरपालिकेच्या फेरमूल्यांकन व मालमत्ता कर आकारणीसाठी स्थापत्य कन्सल्टंट इंडिया प्रा. लि., अमरावती यांनी सादर केलेल्या दरपत्रकास मंजुरी देण्यात आली.

मंठा चौफुली येथील व्यापारी संकुलाच्या बांधकामाबाबत सविस्तर आढावा घेण्यात आला. या प्रकल्पातील बांधकाम पूर्ण झालेल्या गाळ्यांचा ताबा पुढील आठवड्यात महानगरपालिकेला मिळणार असल्याची माहिती सभेत देण्यात आली.

शहरातील ५,५०० चौरस मीटरपेक्षा मोठ्या सर्व इमारतींचे फायर सेफ्टी ऑडिट करण्यात यावे, तसेच अग्निसुरक्षा उपकरणांची तपासणी करून आवश्यक कार्यवाही करावी, अशा सूचना सभापतींनी संबंधित विभागाला दिल्या.

पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर प्रत्येक प्रभागात वृक्षारोपण करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच स्ट्रीट लाईट बसविण्यासाठी निधी उपलब्ध करून देणे आणि नळ पाईपलाईन दुरुस्तीसाठी स्वतंत्र निधी मंजूर करण्याचे प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे शिफारस करण्यात आले.

महापालिकेविरुद्ध सुरू असलेल्या न्यायालयीन प्रकरणांची *(पान २ वर)*

## दररोज पाणीचे स्वप्न पुन्हा लांबणीवर; आता २०२७ मध्ये तिसऱ्या दिवशीच पाणीपुरवठ्याचे लक्ष्य

### निवडणुकीतील आश्वासनांवर प्रश्नचिन्ह; स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर यांचे स्पष्टीकरण चर्चेत

**जालना - प्रतिनिधी**

जालना महानगरपालिका निवडणुकीदरम्यान शहरवासीयांना दररोज किंवा किमान एक दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन देणाऱ्या भाजपसमोर आता पाणीपुरवठ्याचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. स्थायी समिती सभापती अशोक पांगारकर यांनी दिलेल्या वक्तव्यानुसार, शहरात दररोज पाणीपुरवठा तातडीने शक्य नसून सन २०२७ जानेवारी मध्ये तिसऱ्या दिवशी नियमित पाणीपुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. या वक्तव्यानंतर निवडणुकीतील आश्वासनांबाबत नागरिकांमध्ये नव्याने चर्चा सुरू झाली आहे.



भाजपने महानगरपालिका निवडणुकीत जालनेकरांना पाणीटंचाईतून मुक्त करण्याचे आश्वासन दिले होते. या आश्वासनाला नागरिकांनी प्रतिसाद देत पक्षाला मोठे बहुमत दिले. मात्र सत्तेत आल्यानंतर दररोज किंवा एक दिवसाआड पाणीपुरवठ्याऐवजी जानेवारी २०२७ मध्ये तिसऱ्या दिवशी पाणी देण्याचे लक्ष्य जाहीर झाल्याने अनेकांनी नाराजी व्यक्त केली आहे.

सभापती अशोक पांगारकर यांनी आपल्या वक्तव्यात शहरातील पाणीपुरवठा योजनेतील तांत्रिक अडचणी, सुरू असलेली विविध कामे आणि वितरण व्यवस्थेतील सुधारणा पूर्ण झाल्यानंतर परिस्थितीत बदल होईल, असे सांगितले. सध्या उपलब्ध पायाभूत सुविधांच्या मर्यादांमुळे टप्प्याटप्प्याने सुधारणा करण्यावर भर असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

मात्र या भूमिकेमुळे विरोधकांना सरकार आणि सत्ताधाऱ्यांवर टीका करण्याची संधी मिळाली आहे. निवडणुकीपूर्वी दिलेली आश्वासने आणि सध्याची भूमिका यामध्ये मोठी तफावत असल्याचा आरोप होत असून, जालनेकरांना दररोज पाणी मिळण्याचे स्वप्न पुन्हा एकदा लांबणीवर पडल्याची भावना नागरिक व्यक्त करत आहेत.

दरम्यान, शहरातील अनेक भागांमध्ये अद्यापही अनियमित पाणीपुरवठा, कमी दाबाने पाणी येणे आणि लांब अंतराने पाणी मिळणे या समस्या कायम आहेत. त्यामुळे पाणीपुरवठा सुधारण्यासाठी महापालिकेने निश्चित कालबद्ध कृती आराखडा जाहीर करून त्याची प्रभावी अंमलबजावणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.

आगामी काळात पाणीपुरवठा सुधारण्याबाबत महापालिका कोणती ठोस पावले उचलते आणि निवडणुकीतील आश्वासनांची कितपत पूर्तता करते, याकडे संपूर्ण जालनेकरांचे लक्ष लागले आहे.



श्री संत श्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली पालखी सोहळा आळंदी ते पंढरपूर पायी वारी आज जेजुरी येथे पोहचली असता वारी मध्ये सहभागी परभणीचे खासदार संजय उर्फ  बंडू जाधव, यांच्या सह महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस चे पदाधिकारी प्रभाकर मामा पवार, प्रेस फोटोग्राफर अनिल व्यवहारे, शहाजीराव देशमुख, वसंतराव  उढाण, रामकृष्ण  आर्दड, प्रेस फोटोग्राफर  रामेश्वर गडगिळे, संजय मगर, श्रीकांत देवडे व इतर वारकरी छायाचित्रात दिसत आहे. *(छाया- अतुल व्यवहारे)*

## शिवदत्त हाउसिंग सोसायटीत महारुद्र हनुमान मंदिर व इच्छा पूर्ती महादेव मंदिर सभागृहाचे लोकार्पण

### आ.अर्जुनराव खोतकर यांचे नागरिकांनी मानले आभार



**जालना - प्रतिनिधी**

जालना शहरातील शिवदत्त हाउसिंग सोसायटी परिसरातील महारुद्र हनुमान मंदिर व इच्छा पूर्ती महादेव मंदिरासाठी उभारण्यात आलेल्या सभागृहाचे लोकार्पण आज ✻शिवसेना उपनेते तथा आमदार अर्जुनराव खोतकर आणि नगरसेविका दर्शना झोल खोतकर यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले. यावेळी परिसरातील भाविक व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

शिवदत्त हाउसिंग सोसायटी परिसरातील महारुद्र हनुमान मंदिर व इच्छा पूर्ती महादेव मंदिर येथे धार्मिक, सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी स्वतंत्र सभागृहाची आवश्यकता असल्याने *(पान २ वर)*

## एससी उपवर्गीकरणाविरोधात जाफ्राबाद येथे २८ जुलै रोजी जनआक्रोश मोर्चा

**दत्ता देशमुख**

अनुसूचित जाती (एससी) आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात जाफ्राबाद येथे मंगळवार,दि.२८जुलै २०२६ रोजी सकाळी ११ वाजता तहसील कार्यालयासमोर विराट जन आक्रोश मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे. या मोर्चाचे आयोजन समस्त बौद्ध समाज व एससी उपवर्गीकरण विरोधी समन्वय समिती, ता. जाफ्राबाद, जि.जालना यांच्या वतीने करण्यात आले असून,तालुक्यातील हजारो समाजबांधव या आंदोलनात सहभागी होणार असल्याची माहिती आयोजकांनी दिली.

आयोजकांच्या मते,अनुसूचित जातींच्या आरक्षणाचे उपवर्गीकरण करण्याचा निर्णय सामाजिक ऐक्याला बाधा पोहोचवणारा असून,संविधानाने दिलेल्या समान हक्कांच्या तत्त्वाशी विसंगत आहे. त्यामुळे हा निर्णय मागे घेण्यात यावा,या प्रमुख मागणीसाठी हा विराट जनआक्रोश मोर्चा काढण्यात येत आहे.

मोर्चामध्ये तालुक्यातील विविध गावांतील बौद्ध समाज,सामाजिक संघटना, युवक, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच *(पान २ वर)*

### आंबा येथील जवाहर नवोदय विद्यालयातील खळबळजनक प्रकार

## नववीच्या विद्यार्थ्यावर अकरावीतील विद्यार्थ्यांकडून रॅगिंग व अमानुष मानसिक छळ

**परतूर - प्रतिनिधी**

येथील आंबा रस्त्यावरील नामांकित जवाहर नवोदय विद्यालयात एक अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक प्रकार समोर आला आहे. इयत्ता ९ वीत शिकणाऱ्या एका निष्पाप विद्यार्थ्याला अकरावीच्या ७ वरिष्ठ विद्यार्थ्यांनी मिळून बेदम मारहाण करत, कपडे धुण्यास भाग पाडून तीव्र मानसिक व शारीरिक छळ केल्याची घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी पीडित विद्यार्थ्याच्या पालकांनी थेट शिक्षण मंत्रालय, जिल्हाधिकारी आणि पोलिसांकडे लेखी तक्रार दाखल केल्यानंतर विद्यालयात एकच खळबळ उडाली आहे. घटनेचे गांभीर्य ओळखून विद्यालयाच्या अंतर्गत अँटी-रॅगिंग कमिटीने तात्काळ चौकशी चक्र फिरवून दोषी आढळलेल्या सातीही विद्यार्थ्यांना ८ दिवसांसाठी विद्यालयातून निलंबित केले आहे.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, तक्रारदार श्री. संतोष शिवाजीराव कोल्हे (वय ३८, रा. सराफ गव्हाण, ता. घनसावंगी, जि. जालना) यांचा मुलगा शिवराज संतोष कोल्हे हा जवाहर नवोदय विद्यालयात इयत्ता ९ वी (ब) मध्ये शिक्षण घेत आहे. सन २०२३ मध्ये त्याने इयत्ता ६ वीत या विद्यालयात प्रवेश घेतला होता. गेल्या काही दिवसांपासून विद्यालयातीलच अकरावीच्या काही वरिष्ठ विद्यार्थ्यांकडून त्याचा सातत्याने छळ केला जात होता. २ जुलै २०२६ रोजी शाळा पूर्ववत सुरू झाल्यानंतर शिवराज नव्या आशेने विद्यालयात गेला होता. मात्र, ३ जुलै २०२६ पासून वरिष्ठ विद्यार्थ्यांनी पुन्हा त्याला लक्ष्य करण्यास सुरुवात केली.

तक्रार अर्जात नमूद करण्यात आलेले छळाचे गंभीर स्वरूप:

अमानुष रॅगिंग: अकरावीतील वरिष्ठ विद्यार्थ्यांनी संगनमत करून ९ वीच्या लहान मुलाला त्रास देण्यास सुरुवात केली.

कपडे धुण्याची सक्ती: स्वतःचे वैयक्तिक कपडे ९ वीच्या या विद्यार्थ्याकडून बळजबरीने धुवून घेतले जात होते.

मारहाण व टिंगल-टवाळी: कुठलेही कारण नसताना शिवराजला बेदम मारहाण व धक्काबुक्की केली जात होती, तसेच येता-जाता त्याची टिंगल-टवाळी करून प्रचंड मानसिक त्रास दिला जात होता.

अपमानस्पद वागणूक: इतर समवयस्क मित्रांसमोर त्याची हसतीमजाक करून त्याचा सतत घोर अपमान केला जात होता, *(पान २ वर)*

### सर्व दोषी विद्यार्थी ८ दिवसांसाठी निलंबित

**''विद्यार्थ्याने सुरुवातीला भीतीपोटी शाळा प्रशासनाकडे थेट तक्रार केली नव्हती, तर थेट पालकांना माहिती दिली. पालकांनी तक्रार केल्यानंतर विद्यालयाच्या अंतर्गत अँटी-रॅगिंग कमिटीने अत्यंत तातडीने या प्रकरणाची चौकशी केली. या चौकशीत दोषी आढळलेल्या सातीही विद्यार्थ्यांना ८ दिवसांसाठी निलंबित करण्यात आले आहे.''**

**एस. जी. पवार**

**(प्रभारी मुख्याध्यापक, जवाहर नवोदय विद्यालय, परतूर)**

# संपादकीय....

## भीम पार्कचा वाद की राजकीय बाणयुद्ध?

जालना शहरातील प्रस्तावित भीम पार्क व विपश्यना केंद्र हा प्रकल्प आता केवळ विकासाचा विषय राहिलेला नाही; तो राजकीय आरोप-प्रत्यारोपांचा केंद्रबिंदू बनला आहे. एका बाजूला आमदार अर्जुनराव खोतकर हे राज्य शासनाकडून १३० कोटी रुपयांचा निधी मंजूर झाल्याचा दावा करत विरोधकांवर विकासविरोधी भूमिका घेत असल्याचा आरोप करतात, तर दुसऱ्या बाजूला माजी आमदार कैलास गोरंट्याल हे प्रशासकीय प्रक्रिया, पर्यावरणीय मंजुरी, जमीन हस्तांतरण आणि कायदेशीर बाबी पूर्ण झाल्याशिवाय प्रकल्पाला अंतिम मंजुरी मिळू शकत नाही, असा युक्तिवाद करतात. त्यामुळे हा वाद केवळ राजकीय नाही, तर प्रशासनिक प्रक्रियेच्या समजुतीचाही बनला आहे.

राजकारणात प्रतीकांना मोठे महत्त्व असते. या वादातही एकीकडे अर्जुनास्त्र तर दुसरीकडे त्रिशूळ अशी प्रतिमा निर्माण झाली आहे. अर्जुनाचे बाण विकासाच्या घोषणांचे प्रतिनिधित्व करत असतील, तर त्रिशूळ हा प्रशासकीय आणि कायदेशीर प्रश्नांचा भेदक वार म्हणून समोर येत आहे. मात्र या संघर्षात सर्वात महत्त्वाचा मुद्दा दुर्लक्षित होत आहे, तो म्हणजे भीम पार्क प्रत्यक्षात कधी आणि कसा उभा राहणार? खरे पाहता, मोठ्या सार्वजनिक प्रकल्पांसाठी निधी जाहीर होणे आणि प्रत्यक्ष काम सुरू होणे यामध्ये मोठा फरक असतो. जमीन हस्तांतरण, पर्यावरणीय मंजुरी, तांत्रिक व्यवहार्यता, विकास आराखड्यातील बदल आणि प्रशासकीय मान्यता या सर्व टप्प्यांनंतरच प्रकल्प प्रत्यक्ष मार्गी लागतो. त्यामुळे केवळ निधी मंजूर झाल्याचा दावा किंवा केवळ प्रक्रियेचा आधार घेऊन विकासाला विरोध होत असल्याचे म्हणणे, या दोन्ही बाबींची वस्तुनिष्ठ पडताळणी होणे आवश्यक आहे.

गोरंट्याल यांनी पत्रकार परिषदेत जिल्हाधिकाऱ्यांचे निर्देशपत्र सादर करून काही प्रशासकीय प्रश्न उपस्थित केले. त्याचवेळी खोतकर यांनी हा प्रकल्प जालना शहराच्या विकासासाठी महत्त्वाचा असल्याचा दावा केला. या दोन्ही भूमिकांमध्ये राजकीय संघर्ष असला, तरी सत्य काय आहे, याचा निर्णय कागदपत्रे, शासनाचे आदेश आणि प्रत्यक्ष प्रशासकीय कार्यवाही यावरच होईल.

या वादाचा आणखी एक पैलू म्हणजे राजकीय संवादाचा बदलता स्तर. ‘‘अभ्यास कर बाळा‘‘ किंवा ‘‘विकासाला विरोध‘‘ अशा टोमण्यांमुळे राजकीय वातावरण तापते; परंतु त्यातून प्रकल्प पुढे सरकत नाही. नागरिकांना शब्दांचे युद्ध नव्हे, तर कामाची प्रगती पाहायची आहे.

भीम पार्क हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी संबंधित संवेदनशील आणि महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. त्यामुळे या विषयावर राजकीय श्रेयवादापेक्षा सर्वपक्षीय सहमती आणि समन्वय अधिक महत्त्वाचा ठरतो. जर हा प्रकल्प खरोखर महाराष्ट्रातील एक आदर्श स्मारक बनवायचा असेल, तर सत्ताधारी, विरोधक आणि प्रशासन यांनी परस्परांवर आरोप करण्याऐवजी आवश्यक मंजुरी आणि प्रक्रिया वेळेत पूर्ण करण्यासाठी एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. आज भीम पार्कच्या प्रश्नावर अर्जुनास्त्र आणि त्रिशूळ आमनेसामने उभे आहेत. मात्र जिंकायला कोणतेही अस्त्र नाही, तर जिंकायला हवा तो जालना शहराचा विकास. राजकीय बाणयुद्ध कितीही रंगले, तरी शेवटी इतिहास त्याच नेत्यांची नोंद ठेवतो, ज्यांनी वाद नव्हे तर विकास पूर्ण करून दाखवला.

### एकल पालकांच्या मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप

## आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शिक्षण हाच सर्वात सोपा व प्रभावी मार्ग-प्रा. झांजरी



**परतूर - प्रतिनिधी**

कुटुंबाची आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी शिक्षण हाच सर्वात सोपा आणि प्रभावी मार्ग आहे.ही बाब विचारात घेता एकल पालकांनी आपल्या पाल्यांच्या शिक्षणाला प्राधान्य द्यावे.सातत्यपूर्ण अभ्यासानेच प्रगती साध्य होते, असे प्रतिपादन जालना एज्युकेशन फाउंडेशनचे ट्रस्टी तथा एकल पालक प्रकल्पाचे प्रकल्प प्रमुख प्रा. ओमप्रकाश झांजरी यांनी येथे केले.

जालना एज्युकेशन फाउंडेशन व साऊ एकल समिती जालनातर्फे परतुर मंठा तालुक्यातील एकल पालक च्या बालकाना शैक्षणिक सहित्य वाटप परतुर येथील स्नेहांकुर प्रकल्प मापेगाव पुनर्वसन परतूर येथे परतूर व मंठा तालुक्यातील लोकसभागातून शैक्षणिक साहित्याचे वाटप करण्यात आले प्रा. ओमप्रकाश झांजरी, जालना एज्युकेशन फाउंडेशनचे समन्वयक रुक्मिणीकांत दीक्षित, सतीश काळे, साऊ एकल समितीचे जिल्हा समन्वयक तथा आधार बहुउद्देशीय सेवाभावी संस्था वाटुर अध्यक्ष एकनाथ राऊत मा तयब पठाण अध्यक्ष आझाद बहुउउदेशिय सेवाभावी संस्था मा प्रदिप कातारे संचालक स्नेहकुर प्रकल्प परतुर यांच्याहास्ते मुलांना शैक्षणिक साहित्य वाटप करण्यात आले, त्याप्रसंगी प्रा. झांजरी बोलत होते. ते पुढे म्हणाले की, शैक्षणिक साहित्य वाटप करून आम्ही काही प्रमाणात एकल पालकांचा आर्थिक भार कमी करण्याचा प्रयत्न केला आहे. विद्यार्थ्यांनी मागील इयत्तेपेक्षा आगामी परीक्षेत जास्त गुण मिळवण्याची जिद्द बाळगावी.

# खेळ कुणाला दैवाचा कळला...

## अभिनेते रवींद्र महाजन स्मृतिदिन

मराठी चित्रपट सृष्टीतील आजवरचा सर्वात देखणा नायक, मराठीतील विनोद खन्ना अशी बिरुदावली लागलेला, सत्तर आणि ऐंशीच्या दशकातील मराठी मुलींच्या स्वप्नातील राजकुमार, मराठीतील सुपरस्टार, जेष्ठ अभिनेते रवींद्र महाजनी यांचा आज तिसरा स्मृतिदिन. तीन वर्षापूर्वी १४ जुलै २०२३ रोजी रवींद्र महाजनी यांच्या निधनाची बातमी आली आणि संपूर्ण महाराष्ट्राच्या काळजाचा ठोका चुकला. तसे त्यांचे निधन वयाच्या ७७ व्या वर्षी झाले म्हणजे वृद्धपकाळाने त्यांचे निधन झाले. निधनानंतर दोन दिवसांनी पुण्यातील एका सदनिकेत त्यांचा मृतदेह आढळला तेंव्हा सर्व जण हळहळले. त्यांचा अशा प्रकारे मृत्यू होणे हे जितका धक्कादायक आहे तितकेच ते मनाला चटका लावून जाणारेही होते. ज्यांचे आयुष्य प्रेक्षकांच्या गराड्यात गेले त्यांना अशाप्रकारे एकाकी मरण यावे हा दैवाचा अजब खेळ म्हणावा लागेल. त्यांच्याच देवता चित्रपटातील खेळ कुणाला दैवाचा कळला.... हे गाणे या निमित्ताने सर्वांना आठवले अर्थात आयुष्यभर स्टारडम मिळवूनही अशाप्रकारे एकाकी शेवट झालेले रवींद्र महाजनी हे पहिले कलाकार नाहीत याआधी जेष्ठ अभिनेत्री ललिता पवार, दक्षिणेतील सिल्क स्मिता, हिंदी चित्रपटातील नायिका परवीन बाबी, बॉलिवूडची सुपरस्टार श्रीदेवी या कलाकारांचा शेवट देखील अशाच प्रकारे चार भिंतीच्या आत झाला. पैसा आणि प्रसिद्धीसाठी संपूर्ण आयुष्य वेचलेल्या या कलाकारांना उतार वयात पैसा आणि प्रसिद्धी खरंच कामी येतात का....? याचा प्रत्येक कलाकारांनी करायला हवा अर्थात हा विचार फक्त कलाकारांनीच नव्हे तर सर्वांनीच करायला हवा. स्टारडम, पैसा, प्रसिद्धी, सत्ता हे सगळं क्षणभंगुर आहे. खरंच खेळ कुणाला दैवाचा कळला हेच अंतिम सत्य आहे. रवींद्र महानजी यांचा जन्म ७ ऑक्टोबर १९४९ रोजी बेळगाव येथे झाला. लहानपणापासून त्यांना अभिनयाची आवड होती. शाळेच्या स्नेहसंमेलनात ते आपल्या अभिनयाची हौस भागवून घेत. शालेय जीवनातच ते नाटकात काम करू लागले. शिक्षण पूर्ण झाल्यावर अभिनय क्षेत्रात करियर करण्यासाठी ते मुंबईत आले. मधुसूदन कालेलकर यांनी त्यांना जाणता अजाणता या नाटकात पहिली संधी दिली. या नाटकातील त्यांच्या अभिनयामुळे त्यांना झुंज चित्रपटात नायकाची भूमिका मिळाली. त्यांचा हा पहिलाच चित्रपट आणि त्यातील त्यांची भूमिका खूप गाजली आणि मराठी चित्रपट सृष्टीला नवा सुपरस्टार लाभला. त्यानंतर त्यांनी मागे वळून पाहिले नाही. त्यांनी अभिनय केलेले सर्वच चित्रपट गाजले. यात आराम हराम है!, लक्ष्मी, लक्ष्मीची पावले, देवता, गोंधळात गोंधळ, मुंबईचा फौजदार हे चित्रपट तर प्रेक्षकांनी डोक्यावर घेतली. आजही दूरदर्शनवर हे चित्रपट लागले तर प्रेक्षक आवडीने पाहिले. या चित्रपटातील गाणीही खूप गाजली. त्यांनी अनेक नाटकातही भूमिका केल्या, बेलभांडार अपराध मीच केला या नाटकातील भूमिका खूप गाजल्या. त्यांनी काही चित्रपट आणि नाटके देखील दिग्दर्शित केली. ९० च्या दशकात काही टीव्ही वरील मालिकेतही त्यांनी भूमिका केल्या. काही मालिका दिग्दर्शित केल्या. मधल्या काळात ब्रेक घेऊन त्यांनी काय राव तुम्ही, कॅरी ऑन मराठा, देऊळ बंद, पानिपत या चित्रपटात चरित्र नायकाच्या भूमिका केल्या . त्यांच्या अभिनय कलेसाठी त्यांना अनेक पुरस्कार देखील मिळाले. त्यांच्या निधनाने मराठी चित्रपट सृष्टीने एक राजबिंडा नायक गमावला. रवींद्र महाजनी यांना भावपूर्ण आदरांजली!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे**
**९९२२५४६२९५**

## पान १ व ४ वरुन...

### जालना महापालिकेच्या...

संपूर्ण माहिती पुढील सात दिवसांत सादर करण्याचे निर्देश देण्यात आले. शहरातील बंद पडलेल्या घंटागाड्यांऐवजी नवीन घंटागाड्या खरेदी करण्याचा प्रस्ताव तयार करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच बंद अवस्थेतील पाण्याचे टँकर दुरुस्त करून गंगागईमुक्ती व फवारणीच्या कामासाठी वापरण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याचे ठरले.

जन्म व मृत्यू प्रमाणपत्रे देण्यास होणारा विलंब गंभीरपणे घेत आरोग्य विभागाला यापुढे नागरिकांच्या तक्रारी येणार नाहीत, याची दक्षता घेण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले. डॉ. सचदेव यांच्या दवाखान्यासमोरील कोंडवाड्यावर झालेले अतिक्रमण हटवून ती जागा महापालिकेच्या ताब्यात घेण्याचे आदेश देण्यात आले. शहरातील मोकाट जनावरांसाठी कोंडवाड्याचा वापर करण्यासोबतच मोकाट कुत्र्यांसाठी स्वतंत्र डॉग हाऊस उभारण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला. जे.ई.एस. महाविद्यालयाजवळील स्विमिंग पूलची जागा महापालिकेच्या ताब्यात घेण्याबाबत मालमत्ता विभागाला कार्यवाहीचे निर्देश देण्यात आले. शहरातील ओपन स्पेसमधील १० टक्के जागेबाबत आलेल्या अर्जांवर चर्चा करून विषय सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात आला. विविध कॉलनींमध्ये नामफलक उभारण्यासाठी निधी उपलब्ध करून देण्याचीही शिफारस करण्यात आली. मस्तगड येथील सरदार वल्लभभाई पटेल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, संविधान स्तंभ, अंबड चौफुली येथील अहिल्यादेवी होळकर, नूतन वसाहत व आदर्श नगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर तसेच महावीर चौकातील स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्या पुतळ्यांचे सुशोभीकरण करण्याचा प्रस्ताव सर्वसाधारण सभेकडे पाठविण्यात आला. कन्हैयानगर येथील स्मशानभूमीची जागा ताब्यात घेऊन संरक्षक भिंत व सुशोभीकरण करण्याचाही निर्णय शिफारस स्वरूपात मंजूर करण्यात आला.

नूतन वसाहत मुख्य रस्त्यावर भरणारी भाजी मंडई आनंदनगर येथील भाजी मंडईत स्थलांतरित करण्याबाबत नियमानुसार कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात आले. महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान अभियानातील स्थानिक हिस्सा १६व्या वित्त आयोगातून उपलब्ध करून देण्यासाठी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्याची शिफारस करण्यात आली. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांमधून निधी मिळविण्यासाठी प्रस्ताव तयार करण्याचेही निर्देश देण्यात आले. बांधकाम विभागाने प्रलंबित देयके, सुरू असलेली कामे, कार्यारंभ आदेश दिल्यानंतरही सुरू न झालेली कामे तसेच बीओटी तत्त्वावरील गाळ्यांची सद्यस्थिती यांचे अहवाल सात दिवसांत सादर करावेत, असे आदेश देण्यात आले. मागील आर्थिक वर्षातील २५ लाख रुपयांखालील कामांचे खर्चाचे विवरणपत्र स्थायी समितीसमोर सादर करण्याचे निर्देशही सर्व विभागप्रमुखांना देण्यात आले.

सभेदरम्यान स्थायी समितीचे सभापती अशोक उर्फ लक्ष्मीकांत पांगारकर यांनी बैठकीस उशिरा उपस्थित राहिलेल्या अधिकारी व कर्मचाऱ्यांना नोटिसा बजावण्याचे आदेश दिले. तसेच सभेत झालेल्या सर्व चर्चांवरील कार्यवाही सात दिवसांत पूर्ण करून पुढील स्थायी समितीच्या बैठकीत अहवाल सादर करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.

बैठकीस स्थायी समितीचे सदस्य भास्कर दानवे, महावीर ढक्का, अक्षय गोरंट्याल, महेश निकम, शशिकांत घुगे, अशोक पवार, भाग्यश्री जोगस, पद्मा मानधाणी, पूजा भगत, फारुख तुंडीवाले, अमजद खान, नगमाबी फेरोज खान, अब्दुल सगीर शेख यांच्यासह महापालिकेचे नगरसचिव तथा सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे, उपायुक्त नंदा गायकवाड, उपायुक्त त्र्यंबक कांबळे, मुख्य लेखाधिकारी, सहाय्यक आयुक्त, विभागप्रमुख आणि विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

### शिवदत्त हाउसिंग...

परिसरातील नागरिकांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांच्याकडे सभागृह उभारण्याची मागणी केली होती. नागरिकांची ही मागणी लक्षात घेऊन आमदार खोतकर यांनी आपल्या मुलभूत सोई सुविधा योजनेतुन सभागृहाच्या बांधकामासाठी निधी उपलब्ध करून दिला. त्यातून साकारलेल्या सभागृहाचे आज लोकार्पण करण्यात आले.

लोकार्पण सोहळ्यानंतर परिसरातील नागरिकांनी आमदार अर्जुनराव खोतकर यांचा शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. यावेळी नागरिकांनी, ‘‘आपण दिलेला शब्द पाळला असून परिसराच्या विकासासाठी सातत्याने पाठबळ दिले,‘‘ अशा शब्दांत आमदार खोतकर यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली. यावेळी आमदार अर्जुनराव खोतकर यांनी उपस्थितांशी संवाद साधताना परिसराच्या सर्वांगीण विकासासाठी आपण नेहमीच कटिबद्ध असून नागरिकांच्या विकासकामांना प्राधान्य देत राहणार असल्याचे सांगितले. धार्मिक स्थळांसोबतच सामाजिक सुविधा सक्षम करण्यासाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न कायम राहील, असेही त्यांनी नमूद केले या लोकार्पण सोहळ्यास स्थानिक पदाधिकारी, मंदिर समितीचे सदस्य, शिवसेना कार्यकर्ते, महिला, ज्येष्ठ नागरिक तसेच परिसरातील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. यावेळी जिल्हा संपर्क प्रमुख पंडितराव भुतेकर, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे, शहरप्रमुख विष्णू पाचफुले, नगरसेविका दर्शना झोल, सौ. उषाताई पांगारकर, नगरसेवक अमोल ठाकूर, नगरसेवक निखील पगारे, नगरसेवक किशोर पांगारकर, सरपंच सर्जेराव शिंदे, ग्रामपंचायत सदस्य सुमित वाघमारे, सुखदेव भुंबर, लक्ष्मणराव (आप्पा) अवघड यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमास विष्णू मानकर, कैलास चव्हाण, सुधाकर पवार, मातणे साहेब, कांगणे सर, संतोष शिंदे, गोरखनाथ मदन, दिनेश राठोड, रामेश्वर अनारसे, सौ. मनीषाताई भुंबर, सीताबाई इंगळे, विजय ढवळे, माजी सरपंच बंडू शिंदे यांच्यासह गोकुळधाम परिसरातील नागरिक, महिला भगिनी व शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### आंबा येथील...

ज्यामुळे शिवराज अत्यंत भीतीच्या छायेखाली वावरत होता. या सततच्या त्रासाला आणि छळाला कंटाळून पीडित शिवराज प्रचंड मानसिक दडपणाखाली आला. मानसिक धक्का बसल्यामुळे त्याचा जीव कासावीस होऊन तो नैराश्यात गेला आणि रडू लागला. अखेर हा त्रास असह्य झाल्याने त्याने वडिलांना फोन करून ‘‘मला घरी घेऊन जा, मला इथे राहायचे नाही‘‘ अशी आर्त हाक मारली. पालकांनी तात्काळ विद्यालयात धाव घेत शिवराजला घरी आणले. घरी आल्यावर पालकांनी सखोल विचारपूस केली असता, शिवराजने रडत रडत आपल्यासोबत घडलेला हा प्रकार सविस्तर सांगितला.

यापूर्वीही विद्यालयात अशा रॅगिंगच्या घटना घडल्या असून अनेक विद्यार्थ्यांनी पालकांसह तक्रारी केल्या होत्या, मात्र प्रशासनाने याकडे गांभीर्याने न पाहिल्याने हा प्रकार अधिकच वाढल्याचा आरोप तक्रारदाराने केला आहे. पालकांनी या प्रकरणी ११ जुलै २०२६ रोजी प्राचार्य, जिल्हाधिकारी जालना, शिक्षण संचालक, केंद्रीय शिक्षण मंत्री, तसेच तालुका पोलीस स्टेशन परतूर यांच्याकडे लेखी तक्रार अर्ज सादर करून दोषींवर कठोर निलंबनाची व फौजदारी कारवाईची मागणी केली आहे.

या घटनेमुळे जालना जिल्ह्यातील शैक्षणिक वर्तुळात मोठी खळबळ उडाली असून, निवासी शाळांमधील विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलीस प्रशासन व शिक्षण विभाग आता या प्रकरणावर काय पुढील कायदेशीर पाऊल उचलणार, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### एससी उपवर्गीकरणाविरोधात...

संविधानप्रेमी मोठ्या संख्येने सहभागी होणार आहेत. मोर्चा शांततापूर्ण व शिस्तबद्ध पद्धतीने काढण्यात येणार असून,त्यानंतर शासनाच्या नावाने तहसीलदार यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात येणार आहे.

एससी उपवर्गीकरणाविरोधातील लढा अधिक व्यापक करण्यासाठी प्रत्येक गावातील समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे,असे आवाहन समस्त बौद्ध समाज व एससी उपवर्गीकरण विरोधी समन्वय समिती, ता.जाफ्राबाद यांच्या वतीने करण्यात आले आहे.

मोर्चाचा विशेष म्हणजे समन्वयकापैकी कोणीही सूत्रसंचालन करणार नाही,मुख्य विचार मंचावर बसणार नाही,कोणीही स्वागत किंवा सूत्रसंचालन करणार नाही, कोणीही स्वतःला व्हीआयपी म्हणून समाजापेक्षा वेगळ्या असणावर बसणार नाही त्याचबरोबर निवेदन देताना समाजाच्या वतीने लहान बालके देणार संबंधित अधिकाऱ्यांना निवेदन.

दरम्यान, उपवर्गीकरण प्रक्रिया रद्द करण्यात यावी यासाठी मागील २५ दिवसांपासून तहसील कार्यालयासमोर दररोज एक-एका गावातील महिला आणि पुरुष यांच्या सामुदायिक सहभागात समस्त बौद्ध समाज बांधवांच्या सहभागातून बेमुदत साखळी उपोषण सुरू आहे.

### प्रत्येक पात्र...

दिलेली प्रत्येक जबाबदारी वेळेत आणि अचूकपणे पूर्ण करावी. प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचून त्यांना आवश्यक मार्गदर्शन करणे हीच या अभियानाची खरी ताकद असल्याचे त्यांनी सांगितले.

बैठकीस नगरसेवक, पदाधिकारी, मंडल अध्यक्ष, बूथ अध्यक्ष, -२, शक्ती केंद्र प्रमुख तसेच मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

### गुटखा जप्ती...

आरोपीची पोलीस कोठडी मागितली नाही. तसेच मुख्य पुरवठादार व संबंधित गुटखा माफियांपर्यंत पोहोचण्यासाठी आवश्यक तपासही करण्यात आला नसल्याचा आरोप करण्यात आला आहे. मनसेने आणखी एक गंभीर मुद्दा उपस्थित करत, जप्त करण्यात आलेल्या याच पिकअप वाहनावर यापूर्वीही गुटखा वाहतुकीचा गुन्हा दाखल झाल्याचा दावा केला आहे. त्यामुळे वाहनमालक आणि गुटखा रॅकेटमधील मुख्य सूत्रधारांवरही गुन्हा दाखल करून कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

पोलीस अधीक्षकांसारख्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची दिशाभूल करून काही अधिकारी आरोपींना वाचविण्याचा प्रयत्न करीत असल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. त्यामुळे या प्रकरणाची वरिष्ठ स्तरावर स्वतंत्र चौकशी करून दोषी आढळणाऱ्या अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी मनसेने केली आहे. दरम्यान, या निवेदनामुळे जप्ती प्रकरणाच्या तपासावर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, पोलीस प्रशासन या आरोपांची कोणती दखल घेते आणि चौकशीचे आदेश दिले जातात का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

### खा. डॉ. कल्याण काळे व...

आंदोलनकर्त्यांनी शासनाकडून सकारात्मक निर्णय होईपर्यंत आंदोलन सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले.

यावेळी समन्वय समितीचे पदाधिकारी, विविध गावांतील प्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने आंदोलनकर्ते उपस्थित होते.

### जालना येथे...

क्लिक करा.यासाठी काही अडचण आल्यास कार्यालयीन या दुरध्वनी क्रमांकावर०२४८२-२९९०३३वर संपर्क करावा असे आवाहन सहायकआयुक्त, कौशल्यविकास, रोजगार व उद्योजकता, गणेश चिमणकर, यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

### जालन्यात महिलेच्या...

**तांत्रिक पुराव्यांच्या आधारे आरोपी अटकेत**

जालना शहरात घडणारे जबरी चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्याबाबत पोलीस अधीक्षक श्री. तेगबीर सिंह संधू यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव व त्यांच्या पथकाला सूचना दिल्या होत्या. त्यानुसार एलसीबीच्या पथकाने तांत्रिक पुरावे आणि गोपनीय बातमीदारांकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे तपास चक्र फिरवले. या गुन्ह्यातील संशयित आरोपी रोहन योगेश जाधव (वय २० वर्ष, रा. साजापूर एमआयडीसी, वाळुज, छत्रपती संभाजीनगर) याने एका विधीसंघर्षित बालकाच्या मदतीने हा गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. पोलिसांनी वाळुज येथून शोध घेऊन त्यांना ताब्यात घेतले.

३,२५,००० रुपयांचा मुद्देमाल जप्त

पोलिसांनी आरोपींकडून खालील मुद्देमाल जप्त केला आहे:

१. ५०,००० रुपये किमतीची ०८ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन.

२. २,२५,००० रुपये किमतीची गुन्ह्यात वापरलेली यामाहा १५ मोटरसायकल.

३. ५०,००० रुपये किमतीचा आयफोन-१४ कंपनीचा निळ्या रंगाचा मोबाईल.

एकूण जप्त मुद्देमाल: ३,२५,०००/- रुपये.

कारवाई करणारे अधिकारी व अंमलदार

सदरची उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. तेगबीर सिंह संधू, अप्पर पोलीस अधीक्षक श्री. विक्रम साळी, उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अनंत कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. पंकज जाधव, सपोनि श्री. सचिन खामगळ, पोउपनि श्री. राजेंद्र वाघ व पोलीस अंमलदार गोपाल गोशिक, प्रभाकर वाघ, सागर बाविस्कर, दत्ता वाघुंडे, शिवप्रसाद अखंडे, रमेश काळे, अशोक जाधव व स्थानिक गुन्हे शाखेच्या सर्व पथकाने केली आहे.

### इस्रोची अंतरिक्ष...

जाणून घेतला. विज्ञान भारतीचे श्रीपाद कुलकर्णी,अमोल कुंभलकर, सुरेश कुलकर्णी यांनी विविध शाळेतील विद्यार्थ्यांना या संदर्भात संपूर्ण माहिती दिली. विज्ञान वाहिनीतर्फे प्रथम स्वयंसेवकांना माहिती देऊन याच विद्यार्थ्यांनी शहरातील हजारो विद्यार्थ्यांना माहिती दिली.या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत आहेत.

### मनरेगा कुशल...

मात्र, सिस्टीममधील तांत्रिक अडचणींमुळे जुना डिलीट झाला. त्यानंतर प्रशासनात नवीन प्रणाली कार्यान्वित झाली, परंतु या नवीन प्रणाली अंतर्गत जाणीवपूर्वक टाळाटाळ केली जात असल्याचा गंभीर आरोप शेतकऱ्यांनी केला आहे.

**चेहरा पाहून काम; सहाय्यक कार्यक्रम अधिकाऱ्यांवर गंभीर आरोप -**

शेतकऱ्यांचा मुख्य आरोप असा आहे की, वैयक्तिक लाभार्थ्यांची देयके प्रलंबित ठेवून सार्वजनिक कामांची देयके आधी काढण्यात आली आहेत. शासनाकडून आलेला सर्व निधी () सार्वजनिक कामांवर वळवून वैयक्तिक लाभार्थ्यांवर अन्याय केला जात आहे. सहाय्यक कार्यक्रम अधिकारी हे नियमानुसार सिरीयल न लावता, चेहरा पाहून म्हणजेच पक्षपातीपणे काम करत असल्याचा थेट आरोपही शेतकऱ्यांनी निवेदनात केला आहे.

विहिरीचे काम पूर्ण करूनही वर्षभर हक्काचे पैसे न मिळाल्याने ‘‘आम्हाला आमचे पैसे मिळतील की नाही?‘‘ अशी भीती आता शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. कुटुंबाचा उदरनिर्वाह आणि शेतीचा चालू हंगामातील खर्च भागवणे कठीण झाल्याने शेतकरी अत्यंत मानसिक तणावाखाली वावरत आहेत.

या निवेदनावर रुखमाजी आबासाहेब वटाणे, नरहरी बाबुराव बिल्लारे, अमोल त्रिंबक बिल्लारे, ऋषिकेश ज्ञानेश्वर बिल्लारे, अर्जुन आसाराम बिल्लारे, उषा नारायण सुरुंग, मंगल महादेव वाटणे, बाबासाहेब गुलाब सुरुंग, रामभाऊ दगडुब सुरुंग आणि रुखमीन सरजेराव भिंड या १० बाधित शेतकऱ्यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

या आंदोलनाची प्रत आमदार बबनराव लोणीकर, जालना जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच नागपूर व मुंबई येथील रोहयो सचिवालयाला देखील पाठवण्यात आली आहे. आता या तीव्र आंदोलनानंतर तरी प्रशासनाला जाग येणार का आणि शेतकऱ्यांना न्याय मिळणार का, याकडे संपूर्ण परतूर तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# ॥ आरोग्यासाठी उपयुक्त...रानभाज्या...॥

पावसाळा सुरू झाला की महिनाभरात जुलै ऑगस्ट आणि सप्टेंबर मध्ये करटुले, दुडीची फुले ही भाजी मिळायला लागते. कारण ही भाजी राना वनातून, शेताच्या बंधाऱ्यावर, काट्याकुपाठ्यात ही भाजी येत असते. त्यामुळे आदिवासी, भिल्ल, मंडळी ही भाजी मिळवून बाजारात आणतात म्हणून ती आपल्याला मिळते. नाशिक जिल्हा,विदर्भात चंद्रपूर, गडचिरोली,नंदुरबार, शहादा, पालघर, ठाणे, अकोला, जळगाव जिल्ह्यात जामनेर. रावेर. यावल येथे,

व आजूनही काही जिल्ह्यांमध्ये ही भाजी दिसते. सिझन मध्ये ही भाजी खावी अतिशय चविष्ट अशी भाजी असते आणि आरोग्याला उपयोगी अशी आहे . पावसाळा सुरू झाला की ग्रामीण शहरी भागातही या भाज्यांची ग्राहक आतुरतेने वाट बघत असतात.

कर्टुल्यांचीभाजी... कर्टूले, कटुर्ले,कंटोली, नावाने ओळखली जाणारी ही आरोग्यासाठी उपयुक्त आणि शक्तिशाली भाजी मानली जाते. कारण त्यात मल्टीविटामिन, लोह आणि अनेक पौष्टिक घटक असतात.

हिरव्या रंगाची वरुन बारीक मुलायम काटेरी आवरण , असणाऱ्या भाजीमध्ये भरपूर व्हिटॅमिन सी असते, तिला सर्वोत्तम भाजी म्हणतात. वेगवेगळ्या भागात त्याला वेगवेगळे नाव आहे. जेवणात ती चविष्ट लागते. त्यात आरोग्यासाठी खजिनाही आहे. लठ्ठपणा, मधुमेह, बीपी नियंत्रण, कॅन्सर, फ्लू यांसारख्या अनेक मोठ्या आजारांवर ती रामबाण उपाय ठरते. बरेच लोक याला व्हेज चिकन देखील म्हणतात. मात्र, ज्या पद्धतीने ते बनवले जाते त्याप्रमाणे त्याची चव वाढते.गरम पोळी,भाकरी बरोबर ही भाजी छान लागते.

या भाजीमुळे डोकेदुखीमध्ये आराम मिळतो, मायग्रेनसारखे आजारही दूर होतात. यामध्ये अँटिऑक्सिडेंट गुणधर्म असून त्यामुळे त्वचाही चांगली राहते.मुळव्याध, बद्धकोष्ठता या तक्रारीतही ही फायदेशीर आहे, ज्यांना मलावरोधाचा त्रास होत असेल त्यांनी हे रोज खावे कारण यामध्ये फायबरचे प्रमाण चांगले असते. फायबर, फॅट आणि प्रथिने भरपूर असतात.भाजीची आवक कमी असल्याने कुठे पन्नास रुपये, तर कुठे ऐंशी.. शंभर रुपये पाव ही भाजी विक्री होते. शहरी भागात कमी आढळते. आता काही ठिकाणी कर्टुल्यांचे कंद विकसीत करुन बियाणे तयार करून विक्री साठी उपलब्ध आहेत. दोन तीन ठिकाणी प्रायोगिक तत्वावर शेती केल्याचे










वाचण्यात आले.

दुडीची फुलांची भाजी...किती लोकांनी दुडीच्या फुलांची भाजी खाल्ली आहे?

दुडी, दोडी, दवडी, झुटेल, जिवतीची फुलं अशी विविध नावं या फुलांची आहेत. ही फुलं खूप दुर्मिळ आहेत, बाजारात सहसा लवकर उपलब्ध होत नाही. विशेषतः पावसाळ्याच्या सुरुवातीला ही फुलं येतात. रानात किंवा शेताच्या बांधांवर या फुलांची वेल असते. वर्षभर ही वेल वाळलेली असते आणि पावसाळ्यात हिरवीगार होउन जुलै महिन्यात फुलांनी बहरते. या फुलांची भाजी खूप चविष्ट आणि रुचकर बनते. एकदा ज्याने या भाजीची चव घेतली परत परत खावी वाटते. साधारणपणे श्रावण आणि भाद्रपद महिन्यात दुडीची फुले मिळतात. या फुलांची आवक कमी असल्यामुळे तशी ती महागच मिळतात. ४० ते ६० रुपये पाव म्हणजे दोनशे सव्वा दोनशे रुपये किलो जवळपास मिळतात.गरमागरम पोळी,भाकरी बरोबर ही भाजी छान लागते.

हादग्याच्या फुलांची भाजी...वात दोष कमी होण्याकरिता हादग्याचे सेवन फायदेशीर असते. कफ व पित्तदोष कमी करण्यासाठी हादग्याच्या फुलांच्या भाजीचा चांगला उपयोग होतो. हादग्याला 'अगस्ता' असेही म्हणतात. या लहान वृक्षाची लागवड घराभोवती, परस बागेत, तसेच शेताच्या बांधावर करतात. हादग्याचा वृक्ष २५ ते ३० फुटांपर्यंत उंच वाढतो. हा वृक्ष जलद वाढतो, पण त्याचे आयुष्यमान कमी असते. खोड व फांद्या नाजूक व ठिसूळ असतात. फांद्या खोडाच्या वरील भागात पसरणाऱ्या व खाली झुकलेल्या असतात. शेंगा हादग्याला सप्टेंबर ते जानेवारी महिन्यात फुले येतात. थंडी वाजून येणाऱ्या तापावर हादग्याच्या फुलांची भाजी उपयुक्त आहे. याच्या सेवनाने सर्दीचा त्रास कमी होतो. भूक लागत नसल्यास, पोट साफ होत नसल्यास हादग्याच्या भाजीने चांगला गुण येतो. स्त्रियांच्या पाळीतील अनियमितता अथवा पाळीसंबधी तक्रारी या भाजीच्या सेवनाने कमी होतात. हादग्याच्या फुलांत 'अ' जीवनसत्त्वाचे प्रमाण भरपूर असल्यामुळे त्याच्या अभावाने निर्माण होणारे आजार टाळण्यासाठी या भाजीचे नियमित सेवन केल्यास रुग्णाचा त्रास कमी होतो. हादग्याच्या फुलाचे भजीही चविष्ट लागतात.

चिवळची भाजी...चिवळ ही वनस्पती ओलसर, पाणथळ जागेत शेतात व बागेत तण म्हणून वाढते. चिवळ कोकण, पश्चिम महाराष्ट्र, मराठवाडा, विदर्भ, खानदेश या ठिकाणी महाराष्ट्रासह संपूर्ण भारतात वाढते. ही वनस्पती जमिनीवर पसरत वाढते. ही अगदी नाजूक असते. खोडांचा,पानांचा आकार लहान असतो.

चिवळ या वनस्पतीच्या बिया मूत्रपिंडाचे विकारात वापरतात. दातांतून, कफातून तसेच लघवीतून रक्त जात असल्यास ते बंद करण्यास चिवळीचा रस देतात. मार लागल्यास, ठेच लागल्यास दाह आणि सूज कमी करण्यासाठी ही वनस्पती वाटून त्यावर बांधतात. चिवळ ही वनस्पती मूळव्याधीवर गुणकारी आहे. चिवळची भाजी शीतल, आणि रक्तशुद्धी करणारी आहे. रक्तपित्तात ही भाजी प्रशस्त तर ज्वरात पथ्यकर आहे. चिवळीची भाजी शरीरातील उष्णता कमी करणारी व लघवी साफ होण्यासाठी उपयुक्त आहे. लघवीची, हातापायांची व डोळ्यांची होणारी जळजळ चिवळच्या भाजीने कमी होते.

चिवळी वनस्पतीमध्ये मज्जासंस्थेवर प्रभावी कार्य करणारे; तसेच कर्करोग प्रतिबंधक गुणधर्म असल्याचे अलीकडील संशोधनावरून सिद्ध झाले आहे.

कारल्याची भाजी... कारल्याचे फळ थंड व पौष्टिक असून ते खाल्ल्यावर पचनक्रिया सुधारते. खोकला, पित्त, सांधेदुखी, त्वचारोग, कुष्ठरोग, बद्धकोष्ठता, मधुमेह इ. विकारांवर ते गुणकारी असते. कारल्याचे किंवा कारल्याच्या रसाचे नियमित सेवन करणाऱ्याचे वजन कमी होते.

कारल्यात अ, ब आणि क ही जीवनसत्त्वे असतात. कार्ल्याने पचन क्रिया सुधारते. निरोगी राहण्यासाठी, हिरव्या भाज्या आणि फळे खाण्याची शिफारस करतात. फळे आणि भाज्या खाऊन निरोगी राहा. फळे आणि भाज्यांमध्ये अनेक प्रकारचे पौष्टिक घटक असतात. आजी अनेकदा मुलांना कारले खाण्याचा सल्ला देतात. कारले कडू असले तरी अनेक गुणांनी समृद्ध आहे. कारल्याचे सेवन करण्याचे अनेक फायदे आहेत. कारले खाल्ल्याने वजन कमी होते आणि कोलेस्ट्रॉलची पातळीही कमी होते. कारले हृदय गती निरोगी ठेवण्यासाठी देखील उपयुक्त आहे. पण जर तुम्हाला असे वाटत असेल की अधिक प्रमाणात कारले खाल्ल्याने तुमचे आरोग्य चांगले राहील, तर चुकीचे आहे. तांदुळजाची भाजी... तांदूळजाही भारतात उगवणारी एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे. याचा रानभाजी म्हणून समावेश होतो. ही भाजी मधुर रसाने समृद्ध आहे ताप गोर कांजणे, नेत्रविकार, पित्त विकार ,मुळव्याध, यकृत विकारात ही उपयोगी आहे. त्वचेचे विकारात या भाजीचा उपयोग होतो. त्यामुळे दाह कमी होतो. म्हणून ही भाजी महत्त्वाची आहे. नाजूक प्रकृतीच्या व्यक्ती गरोदर स्त्रिया तसेच डोळ्याच्या विकारात पाणी येणे, ही भाजी उपयोगी आहे. वयस्कर माणसासाठी ही भाजी आरोग्यासाठी उपयोगी आहे.

लाल माठ भाजी ..लाल भाजी, श्रावणी माठ असेही म्हटले जाते. या भाजीची.. कोवळी पाने व कोवळे देठ खाण्यायोग्य असतात. जुलै-सप्टेंबर या कालावधीत जंगलात उपलब्ध असते. लोह, अ, ब, व क आदी कॅल्शिअम, मॅग्रेशिअम, फॉस्फरस, झिंक यात आहेत. गुळवेल ची भाजी... गुळवेलाला वारुडवेल, अमृतवेल, अमृतवली गुडूची असेही म्हटले जाते. या भाजीची कोवळी पाने खाल्ली जातात. ही भाजी वर्षभर उपलब्ध असते. या भाजीमध्ये कॅल्शिअम, जीवनसत्त्व अ आणि क, प्रथिने, लोह, फॉस्फरस, तंतूमय पदार्थ व अँन्टिऑक्सिडेंट आहेत.

तरोट्याची भाजी... तरोटा या रानभाजीला टाकळा, तरवटा, चक्रमर्द आदी नावानेसुद्धा ओळखले जाते. या वनस्पतीचे शास्त्रीय नाव कॅशिया टोरा आहे. ही एक आयुर्वेदिक औषधी वनस्पती आहे. हिच्या कोवळ्या पानांची भाजी करतात. ती पौष्टिक व वातनाशक आहे.

तसेच चिगोळ अंबाडी या बाजारी उपयुक्त आहे.

रान भाज्यांची ओळख व्हावी म्हणून अनेक ठिकाणी रानभाजी महोत्सव आयोजित केली जातात . बहतेक सर्वच जिल्ह्यात कृषी विभागामार्फत अशा भाज्यांचे महोत्सव भरवले जातात. जेणेकरून सगळ्यांना या रान भाज्यांची ओळख होईल आणि त्या खाण्यास ते प्रवृत्त होतील. अजून बऱ्याच भागामध्ये आणि बऱ्याच लोकांना या भाज्यांची ओळख नाही, ती व्हावी म्हणूनच असे प्रयत्न केले जातात. ह्या भाज्यांची ओळख व्हावी म्हणून या लेखाद्वारे माहिती संकलीत करून दिलेली आहे. रोगप्रतिकार शक्ती वाढण्यासाठी फायबर तसेच सर्व प्रकारची सूक्ष्म अन्नद्रव्ये मिळण्या करिता रानभाज्या खाव्यात. कोवळ्या अवस्थेतील रानभाज्या आरोग्याच्या दृष्टीने अधिक फायदेशीर असतात.याव्यतिरिक्त अजूनही नंदुरबार, शहादा, गडचिरोली, कोकणात, बऱ्याच रानभाजा आहेत.



**दिलीप देशपांडे.**
**जामनेर. जि.जळगांव**
**मोबा.८९९९५६६९१७**

# पतीकडून पत्नीच्या संमती शिवाय कॉल रेकॉर्डिंग करणे गोपनीयतेच्या अधिकाराचे उल्लंघन

## *उच्च न्यायालयाचा महत्त्वपूर्ण निकाल; ॲड. महेश धन्नावत यांचे प्रतिपादन*

**जालना - प्रतिनिधी**

वैवाहिक संबंधांमध्ये गोपनीयतेच्या अधिकाराला अधोरेखित करणारा एक महत्त्वपूर्ण निकाल नुकताच तेलंगणा उच्च न्यायालयाने दिला आहे. कनपर्थी गंगा श्रीनिवास विरुद्ध इंदुरी श्रावणी या घटस्फोटाच्या प्रकरणात, न्यायमूर्ती नामवरपू राजेश्वर राव यांनी पतीद्वारे पत्नीच्या संमतीशिवाय केलेले कॉल रेकॉर्डिंग पुरावा म्हणून स्वीकारण्यास नकार दिला. न्यायालयाच्या मते, असे कृत्य भारतीय संविधानाच्या कलम २१ अंतर्गत हमी दिलेल्या गोपनीयतेच्या मूलभूत अधिकाराचे स्पष्ट उल्लंघन आहे. या निकालाच्या पार्श्वभूमीवर, प्रसिद्ध विधीज्ञ ॲड. महेश धन्नावत यांनी वैवाहिक नात्यातील कायदेशीर आणि नैतिक मूल्यांवर आपले मत व्यक्त केले आहे.

ॲड. महेश धन्नावत यांनी या निकालाचे स्वागत करत म्हटले की, ''तेलंगणा उच्च न्यायालयाचा हा निर्णय अत्यंत महत्त्वाचा असून तो वैवाहिक नात्यात प्रत्येक व्यक्तीच्या स्वातंत्र्याचा आणि प्रतिष्ठेचा सन्मान करतो. पती आपल्या पत्नीला खाजगी मालमत्ता समजू शकत नाही. विवाह हा दोन समान व्यक्तींमधील एक करार आहे, जिथे दोघांनाही समान हक्क आणि आदर मिळायला हवा. पत्नीच्या नकळत तिचे संभाषण रेकॉर्ड करणे हे केवळ नैतिकदृष्ट्या चुकीचे नाही, तर ते तिच्या गोपनीयतेच्या अधिकारावर केलेला हल्ला आहे.''

ते पुढे म्हणाले, ''प्रत्येक नात्याला, विशेषतः वैवाहिक नात्याला काही प्रोटोकॉल किंवा नैतिक बंधने असणे आवश्यक आहे. विश्वास आणि परस्पर आदर हे कोणत्याही यशस्वी नात्याचे आधारस्तंभ आहेत. जेव्हा एक जोडीदार दुसऱ्याची हेरगिरी करतो किंवा त्याच्या खासगी आयुष्यात डोकावतो, तेव्हा तो या मूलभूत तत्त्वांचा भंग करतो. कायद्याच्या चौकटीत अशा कृतींना कोणतेही स्थान नाही.''

कायद्याच्या सर्वोच्चतेवर भर देताना ॲड. धन्नावत म्हणाले, ''कायदा सर्वांसाठी समान आहे आणि कायद्यापेक्षा कोणीही मोठे नाही. पती असो वा पत्नी, दोघांनाही देशाच्या कायद्यांचे पालन करणे बंधनकारक आहे. जर कोणी कायद्याचे उल्लंघन करत असेल, तर त्याला परिणामांना सामोरे जावे लागेल. घरगुती हिंसाचार कायद्यांतर्गत महिलांना भावनिक आणि मानसिक छळापासूनही संरक्षण दिले आहे, आणि संमतीशिवाय पाळत ठेवणे हा त्याचाच एक भाग आहे.

गोपनीयतेच्या अधिकाराचे महत्त्व स्पष्ट करताना ते म्हणाले, ''सर्वोच्च न्यायालयाने न्यायमूर्ती के. एस. पुट्टास्वामी (निवृत्त) व इतर विरुद्ध भारत सरकार व इतर.या ऐतिहासिक प्रकरणात स्पष्ट केले आहे की गोपनीयतेचा अधिकार हा कलम २१ नुसार जगण्याच्या अधिकाराचा अविभाज्य भाग आहे. तेलंगणा उच्च न्यायालयाने याच तत्त्वाचा पुनरुच्चार केला आहे. जरी भारतीय पुरावा अधिनियम, १८७२ कलम ६५-बी अंतर्गत इलेक्ट्रॉनिक पुरावे स्वीकारण्याची तरतूद असली तरी, जर तो पुरावा मूलभूत अधिकारांचे उल्लंघन करून मिळवला असेल, तर न्यायालय तो नाकारू शकते. या प्रकरणात न्यायालयाने तेच केले आहे.''

ॲड. धन्नावत यांच्या मते, या निकालामुळे वैवाहिक विवादांमध्ये पुरावे सादर करण्याच्या पद्धतीवर दूरगामी परिणाम होतील आणि व्यक्तीच्या खासगी आयुष्याचा सन्मान राखला जाईल. समाजात वैवाहिक संबंधांकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलण्यासाठी आणि नात्यांमध्ये समानता व आदर प्रस्थापित करण्यासाठी असे न्यायालयीन निर्णय अत्यंत आवश्यक आहेत.

# झेडपी शाळा, रस्त्यांची दुरवस्था; लोकप्रतिनिधींवर गावकरी संतप्त

## निवडणुकांपुरतीच कामे होत असल्याचा ग्रामस्थांचा आरोप



**दत्ता देशमुख**

जालना जिल्ह्यातील ग्रामीण भागात जिल्हा परिषदेच्या शाळांची अवस्था अत्यंत बिकट झाली आहे. शाळेच्या खोल्या पडक्या असून काहींचे पत्रे उडालेले आहेत. दुसरीकडे, शेतवस्तीवरून शाळेकडे जाण्यासाठी विद्यार्थ्यांना पक्का रस्ता नाही. पावसाळ्यात मुलांना चिखल तुडवत शाळेत जावे लागते. या समस्येमुळे गावकरी संतप्त झाले असून, लोकप्रतिनिधींनी याकडे पाठ फिरवल्याचा आरोप होत आहे.

जाफ्राबाद तालुक्यातील अनेक गावांमधील जिल्हा परिषद शाळांकडे जाण्यासाठी साठी धड रस्ता नसल्याने विद्यार्थ्यांची मोठी गैरसोय होत आहे. निवडणुका जवळ आल्यावर प्रशासकीय

**६६ पाणंद रस्ते मजबूत करा**

''रस्त्यावर पडलेले खड्डे आणि साचलेले गटार यामुळे शाळकरी मुलांना चिखलातून वाट शोधावी लागते. आमच्या लोकप्रतिनिधींनी वेळ मिळाला तर पाणंद रस्ते आणि रोड मजबुतीकरण करून देण्यासाठी वेळ काढावा.''

**- गजानन पाटील देठे, पालक**

कर्मचारी आणि गुत्तेदार रस्त्यांची डागडुजी करण्यासाठी येतात, मात्र निवडणूक संपताच त्यांच्याकडून दुर्लक्ष केले जाते, अशी खंत स्थानिक नागरिकांनी व्यक्त केली आहे. पुढची निवडणूक येईपर्यंत रस्ते आणि शाळांकडे कोणीही पाहत नाही. जिल्हा परिषदेच्या शाळांची दुरवस्था पाहून अनेक पालक

**६६ शाळा बसला रस्ताच नाही**

''शाळा आहे पण खोल्या नाहीत. कुठे पत्रे उडालेल्या शाळा तर कुठे दांडी मारणारे गुरुजी. त्यामुळे दोन पैसे जास्त जातात पण इंग्रजी माध्यमाच्या शाळेत मुलांना शिक्षण मिळते. परंतु गावाकडे जाण्यासाठी शाळेच्या बसला रस्ता नसल्याने मुलांना फाट्यावर आणून सोडावे लागते.''

**- विलास पवार, पालक**

आपल्या मुलांना इंग्रजी माध्यमाच्या शाळेत प्रवेश घेत आहेत. मात्र, गावाच्या वेशीपासूनच रस्ते चिखलमय आणि खड्डेमय असल्याने तेथेही वाहने चालवताना कसरत करावी लागते. अनेक कुटुंबे आता गाव सोडून शेतवस्तीवर वास्तव्यास आहेत. त्यांच्यासाठी पाणंद रस्ता योजना राबविण्यात येत शेतवस्तीवर असली, तरी या रस्त्यांना क्रमांक

नसल्याने निधी उपलब्ध होत नाही. त्यामुळे ही योजना केवळ कागदावरच उरली आहे. पावसामुळे निर्माण होणाऱ्या चिखलातून आणि खड्ड्यांतून दररोज वाट काढावी लागत असल्याने शेतकरी आणि मजुरांची मोठी अडचण होत आहे. शासनाने या शाळा आणि रस्त्यांकडे तातडीने लक्ष द्यावे, अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

# नीट पेपर फुटल्यावर परिक्षा परत घेतल्या जाते; मग फुटलेल्या आमदार-खासदारांच्या निवडणूका परत का नाही?

भारत लोकशाहीचा देश म्हणून जगप्रसिद्ध आहे.परंतू देशात अलीकडच्या काळात अजब-गजब कहानी घोडेबाजाराच्या माध्यमातून राजकीय वर्तुळात पहायला मिळत आहे.नुकतीच देशात नीट पेपर फुटीचे प्रकार देशभर गाजले.या पेपर फुटी प्रकरणाच्या दरम्यान २० ते २५ विद्यार्थ्यांनी आत्महत्या करून आपली जीवनयात्रा संपवली.या दरम्यान पेपर फुटल्यानंतर सरकारने (शिक्षण विभागाने)दिड-दोन महिन्यात पुन्हा नीटची परीक्षा जाहीर केली व परीक्षा पार पडली.परंतु हाच फार्मुला फुटलेल्या आमदार-खासदारांना (राजकीय वर्तुळात) लागू का होत नाही?असे अनेक प्रश्न आज देशाच्या १४५ करोड जनतेच्या मनात भेडसावत आहे.देशातील प्रत्येक व्यक्तीला कल्पना आहे की, राजकीय पुढारी सत्तेसाठी कुठल्याही स्तरावर जायला तयार असतो.यात सर्वसामान्यांना काहीही देणेघेणे नसते आणि नाही.परंतु देशातील प्रत्येक राज्यात सत्तेसाठी, ईडीच्या कारवाई पासून वाचण्यासाठी किंवा भ्रष्टाचाराच्या माध्यमातून कमविलेली करोडोंची चल-अचल संपत्ती लपविण्यासाठी पक्ष फुटी,आमदार- खासदार फुटी मोठ्या प्रमाणात सुरू आहे आणि हा सर्व प्रकार देशाची १४५ कोटी जनता आपल्या उघड्या डोळ्यांनी पाहत असुन त्यांच्या भावना दुखावत आहे.देशात वेगवेगळ्या विचारांशी संबंधित वेगवेगळे पक्ष आहेत.यात त्यांची नितीमत्ता,आचार-विचार, पक्षाची बांधिलकी आणि देशाच्या व राज्याच्या विकासाच्या प्रती आपुलकी अशा विविध विचारांनी प्रत्येक पक्ष बांधील असतो.परंतू अलिकडच्या काळात ज्या भाजपाला किंवा भाजपविरोधी पक्षांना एकमेकांचे विचार कधीच पटले नाही ते पक्ष आज फक्त सत्तेसाठी एकमेकांचा पक्ष व आमदार- खासदार फोडतांना दिसतात.आमदार-खासदार फोडल्यानंतर ते सत्ताधाऱ्यांना चालतात,त्यांचे आचार-विचार सुध्दा चालते;कारण या मागचा एकच उद्देश असतो तो म्हणजे सत्तेचा लोभ किंवा विरोधक संपविणे. देशाच्या १४५ कोटी जनतेला कल्पना आहे आमदार-खासदार सत्तेसाठी फुटतात. परंतु हेच आमदार-खासदार देशाप्रती व देशाच्या जनतेप्रती घेतलेल्या शपथेचा विचार न करता सत्तेच्या लोभापोटी पक्ष बदलवितांना दिसतात ही बाब जगजाहीर आहे.परंतु पक्षांतर्गत कायद्यानुसार आमदार-खासदारांनी पक्ष सोडला तर त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करून त्या-त्या विधानसभा-लोकसभेच्या क्षेत्रात पुन्हा निवडणुका घ्याव्या लागतात परंतु तसे होतांना अजिबात दिसत नाही ही कसली लोकशाही म्हणावी! सरकार नीट पेपर फुटी नंतर दिड ते दोन महिन्यांत परिक्षा घेऊ शकतात तर प्रश्न निर्माण होतो की, फुटलेल्या आमदार-खासदारांच्या निवडणूका याच आधारावर ताबडतोब का घेतल्या जात नाहीत.यावरून स्पष्ट होते की सरकार सत्तेसाठी कोणत्याही स्तरावर जायला तयार आहेत.आमदार हा राज्याचे नेतृत्व करतो तर प्रत्येक खासदार हा देशाचे नेतृत्व करीत असतो आणि प्रत्येक आमदार-खासदार हा स्वतःच्या बळावर निवडून येत नसतो त्यांच्यामागे पक्षाचे पाठबळ ६० टक्के, जनतेचे पाडबळ ३० टक्के व स्वतःचे अस्तित्व १० टक्के अशा पध्दतीने प्रत्येक आमदार-खासदार निवडून येत असतो.परंतु पक्ष सोडतांना आमदार-खासदार या सर्वांना विसरतात व स्वतः ला त्या क्षेत्राचा मालक(सर्वेसर्वा)समजतात.कारण त्याला सत्तेचा लोभ असतो.

यावरून स्पष्ट होते की, निवडून आल्यानंतर लोकप्रतिनिधी जनतेला व पक्षाला विसरतात. त्यामुळे आमदार-खासदार सत्तेसाठी उंदरासारख्या उड्या मारतांना दिसतात.राजकीय पुढाऱ्यांना माझा सल्ला व विनंती आहे की, लोकप्रतिनिधी असतांना आपण पक्ष हमखास सोडावा यात माझा किंवा देशाच्या १४५ कोटी जनतेचा तिळमात्र विरोध नाही.परंतु पक्ष सोडतांना आमदारकी किंवा खासदारकीचा प्रथम राजीनामा द्यावा.कारण जनतेनी लोकप्रतिनिधी निवडून देतांना आपला विश्वास व्यक्तिवर दर्शविला नसतो तर पक्षावर व त्यांच्या माणुसकीवर दर्शविला असतो.त्यामुळे लोकप्रतिनिधींनी स्वतःच्या स्वार्थासाठी जनतेचा विश्वासघात करू नये.त्यामुळे सर्वप्रथम पक्ष सोडायच्या अगोदर आमदार-खासदारकीचा (लोकप्रतिनिधीचा) राजीनामा दिला पाहिजे.तेव्हाच लोकशाही जिवंत राहिल.सरकारने नीट परीक्षेबाबत देशाच्या २२ लाख ७९ हजार ७४३ विद्यार्थ्यांचा विचार केला आणि नीट पेपर फुटल्यानंतर पुन्हा परीक्षा घेतली याचे मनःपासुन स्वागत.परंतु आमदार जेव्हा फुटतो तेव्हा १४ कोटी लोकांच्या भावना दुखावतात आणि जेव्हा खासदार फुटतो तेव्हा देशाच्या १४५ कोटी जनतेच्या भावना दुखावतात.त्यामुळे सरकारने याबाबतचा गांभीर्याने संग्यान घेऊन हा खेळ खंडोबा थांबविला पाहिजे व फुटलेल्या आमदारांनी राजीनामे राज्यपालांना द्यावे व खासदारांनी राष्ट्रपतींकडे आपले राजीनामे सुपूर्द करावे व या रिक्त पदांच्या जागांवर ताबडतोब निवडणूक घेण्यात याव्यात.अन्यथा फुटलेल्या आमदार-खासदारांना सरकारने सत्तेत घेतले तर लोकशाही धोक्यात येऊ शकते.मी या लेखाद्वारे महामहीम राष्ट्रपती, सर्वोच्च न्यायालय, प्रधानमंत्री, लोकसभा अध्यक्ष, निवडणूक आयोग यांना विनंती करतो की, ज्या प्रमाणे नीट पेपर फुटल्यानंतर काही दिवसातच पुन्हा पेपर घेण्यात आले. त्याच आधारावर फुटलेल्या आमदार-खासदारांच्या मुसक्या आवळण्यासाठी त्यांचे राजीनामे घेवून त्या-त्या विधानसभा-लोकसभा क्षेत्राच्या निवडणुका ताबडतोब घेण्याचे प्रावधान सरकारने ताबडतोब करावे.जय हिंद!

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )**
**मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.**

# प्रत्येक पात्र मतदाराची नोंदणी हीच आपली जबाबदारी – माजी आ.कैलास गोरंट्याल

## भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्यांनी जबाबदारी स्वीकारून अभियान यशस्वी करावे - जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे

**जालना - प्रतिनिधी**

भारतीय जनता पार्टीच्या जालना जिल्हा कार्यालयात (सोमवार) दुपारी ४.०० वाजता स्पेशल इंटेन्सिव्ह रिव्हिजन () अभियानाच्या अनुषंगाने जालना विधानसभा मतदारसंघाची महत्त्वपूर्ण बैठक उत्साहात पार पडली.




बैठकीत विधानसभा क्षेत्रातील बूथनिहाय कामाचा आढावा घेण्यात आला तसेच मतदार नोंदणी, पडताळणी आणि संपर्क अभियान प्रभावीपणे राबविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. या बैठकीला जालना विधानसभा अभियानाचे पालक तथा माजी आ. कैलास गोरंट्याल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर दानवे, महापौर वंदना मगरे, सभापती अशोक पांगारकर, नगरसेवक संगीताताई गोरंट्याल, महावीर ढक्का, गटनेते महेश निकम, युवा नेते अक्षय गोरंट्याल, सिद्धिविनायक मुळे, जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी शेजूळ, नारायण पवार, जिल्हा सरचिटणीस सुनील पवार, अमोल कारंजेकर, शिवप्रकाश चितळकर, मंडळ अध्यक्ष सुनील खरे, संजय डोंगरे, सखुबाई पणबिसरे, पूनम स्वामी, ॲड.रीमा खरात, अनामिका पांगारकर, अनिता खोडवे, माया जोशी, कार्तिका इंगळे, श्रद्धा साळवे, सुलोचना गोर्डे, शशिकांत घुगे, जगदीश भरतिया, अशोक पवार, संतोष माधोवाले, कल्याण भदनेकर, ॲड.भगवान चांदोडे, संजय पाखरे, मजहर सय्यद समद, आनंद झारकंडे, शिवराज नारीयवाले, रोहित भूरेवाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी माजी आमदार कैलास गोरंट्याल यांनी उपस्थित पदाधिकारी, कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, अभियान हे केवळ मतदार यादी पुनरावलोकनाचे काम नसून प्रत्येक पात्र मतदाराला लोकशाही प्रक्रियेशी जोडण्याचे महत्त्वाचे अभियान आहे. प्रत्येक बूथवर सूक्ष्म नियोजन करून घराघरात संपर्क साधावा, मतदारांची प्रत्यक्ष भेट घ्यावी आणि कोणताही पात्र मतदार नोंदणीपासून वंचित राहणार नाही याची दक्षता घ्यावी. असे आवाहन त्यांनी केले.

भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी सांगितले की, प्रत्येक बूथ मजबूत असेल तर संघटना मजबूत राहते. अभियानात भाजपच्या प्रत्येक कार्यकर्त्याने बूथ स्तरावर नियमित संपर्क ठेवून -२ आणि यांच्याशी समन्वय साधावा. पक्षाने (पान २ वर)

# बुलढाणा अर्बन शाखेत शाखा अधिकारी म्हणून वैभव कुलकर्णी रुजू

*व्यापारी महासंघाच्या वतीने स्वागत*



**दत्ता देशमुख**

टेंभुर्णी येथील बुलढाणा अर्बन पतसंस्था शाखा टेंभुर्णी येथे शाखा अधिकारी म्हणून वैभव कुलकर्णी यांची निवड झाल्याबद्दल त्यांचे व्यापारी महासंघाच्या वतीने स्वागत सत्कार करण्यात आले. या वेळी संस्थाचे जेष्ठ संचालक देविदास देशमुख यांची त्यांचे स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या.या वेळी व्यापारी महासंघाचे अध्यक्ष व बुलडाणा अर्बन बँकेचे संचालक अलकेश सोमाणी संचालक प्रदीप काबरा डॉ अविनाश सुरुशे धीरज काबरा श्रीकांत काबरा व्यापारी महासंघाचे उपाअध्यक्ष संजय बोडखे शिवराज सपाटे मनीष सोमाणी भगवान चव्हाण पांडुरंग बोरसे यांच्या कर्मचारी अनिल उखळकर, रोहित देशमुख, वैजिनाथ गिरी, नितीन देशमुख, गजानन सिनकर, संदीप चव्हाण, दीपक तेलंग्रे व अक्षय कुलथे यांची ही या वेळी उपस्थिती होती. वैभव कुलकर्णी हे या पतसंस्था मध्ये अगोदर राहून गेलेले होते त्यांची पुन्हा शाखा अधिकारी म्हणून निवडी बद्दल संस्थेच्या जवळपास ७००० खातेदार यांची समाधान व्यक्त केले.

# गुटखा जप्ती प्रकरणात सदर बाजार पोलिसांवर मेहरबानीचा आरोप; मनसेची सखोल चौकशीची मागणी

## मुख्य आरोपी व पुरवठादारांना वाचविण्याचा प्रयत्न; दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा

**जालना । प्रतिनिधी**

जालना शहरात सात जुलै रोजी स्थानिक गुन्हे शाखेने पकडलेल्या सुमारे सहा लाख रुपयांहून अधिक किमतीच्या गुटखा जप्ती प्रकरणात सदर बाजार पोलिसांनी मुख्य आरोपी व गुटखा पुरवठादारांवर कारवाई करण्यास टाळाटाळ केल्याचा गंभीर आरोप महाराष्ट्र नवनिर्माण सेनेने (मनसे) केला आहे. या संपूर्ण प्रकरणाची निष्पक्ष व सखोल चौकशी करून संबंधित तपास अधिकाऱ्यावर कठोर कारवाई करावी, अन्यथा मनसेच्या वतीने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देण्यात आला आहे.

याबाबत मनसे कामगार जिल्हा सचिव आर. आर. पाटोळे, मनसे सैनिक लखन मदारे, अशोक कांबळे आणि सोमेश मिसाळ यांनी पोलीस अधीक्षकांना निवेदन सादर केले आहे. या निवेदनाच्या प्रती जिल्हाधिकारी तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी यांनाही देण्यात आल्या आहेत. निवेदनानुसार, राज्यात मानवी आरोग्यास घातक असलेल्या जर्दा मिश्रित गुटख्याच्या उत्पादन, वाहतूक, साठवणूक आणि विक्रीवर बंदी असून अशा प्रकरणांमध्ये कठोर कायदेशीर कारवाई केली जात आहे. मात्र, जालन्यातील या प्रकरणात पोलिसांकडून गुटखा माफियांना अभय दिले जात असल्याचा आरोप मनसेने केला आहे. मनसेच्या म्हणण्यानुसार, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने ७ जुलै २०२६ रोजी सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत सापळा रचून एमएच-२१-बीएच-७४०० क्रमांकाचा गुटख्याने भरलेला पिकअप जप्त केला होता. या कारवाईत सहा लाख रुपयांहून अधिक किमतीचा गुटखा जप्त करण्यात आला असून चालक शेख महेबुब याला सदर बाजार पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले. त्यानंतर या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक (एपीआय) साबळे यांच्याकडे सोपविण्यात आला. निवेदनात पुढे असा आरोप करण्यात आला आहे की, तपासादरम्यान चालकाची पोलीस कोठडी घेऊन गुटखा नेमका कोणाचा होता, तो कुठून आणण्यात आला, कोणाला पोहोचविण्यात येत होता, तसेच वाहनाचा मालक कोण आहे, याचा तपास करणे आवश्यक होते. मात्र तपास अधिकाऱ्यांनी (पान २ वर)

# खा. डॉ. कल्याण काळे व माजी आ.चंद्रकांत दानवे यांची जाफ्राबाद येथील साखळी उपोषणस्थळी भेट

## एससी उपवर्गीकरण रद्द करण्याच्या आंदोलनाला पाठिंबा; आंदोलकांच्या भावना जाणून घेत शासनाकडे पाठपुरावा करण्याचे आश्वासन

**दत्ता देशमुख**

एससी उपवर्गीकरण रद्द करण्याच्या मागणीसाठी जाफ्राबाद तहसील कार्यालयासमोर सुरू असलेल्या बेमुदत साखळी उपोषणाला आज खासदार डॉ. कल्याण काळे व माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनी भेट देऊन आंदोलकांशी सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांनी आंदोलनकर्त्यांच्या भावना जाणून घेत त्यांच्या मागण्यांबाबत शासनाकडे योग्य त्या स्तरावर पाठपुरावा करण्याचे आश्वासन दिले.




दि. १८ जून २०२६ पासून समस्त बौद्ध समाज तसेच एससी उपवर्गीकरण विरोधी समन्वय समिती, तालुका जाफ्राबाद यांच्या वतीने तहसील कार्यालयासमोर बेमुदत साखळी उपोषण सुरू आहे. एसी प्रवर्गातील ५९ जातींवरील अन्याय दूर करून एससी उपवर्गीकरण रद्द करण्यात यावे, ही आंदोलनकर्त्यांची प्रमुख मागणी आहे. गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असलेल्या या आंदोलनात तालुक्यातील विविध गावांतील महिला, पुरुष, युवक व ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने सहभागी होत आहेत.

उपोषणस्थळी भेटीदरम्यान खासदार डॉ. कल्याण काळे यांनी आंदोलनकर्त्यांच्या मागण्या, उपोषणाची पार्श्वभूमी तसेच शासनाकडून अपेक्षित असलेल्या निर्णयाबाबत माहिती घेतली. माजी आमदार चंद्रकांत दानवे यांनीही आंदोलकांशी संवाद साधत त्यांच्या भावना समजून घेतल्या.

आंदोलनकर्त्यांनी शासनाने एससी उपवर्गीकरणाचा निर्णय मागे घ्यावा, तसेच सुरू असलेल्या शांततापूर्ण आंदोलनाची तातडीने दखल घ्यावी, अशी मागणी यावेळी दोन्ही लोकप्रतिनिधीं समोर मांडली. (पान २ वर)

# जालना येथे १५ जुलै २०२६ रोजी पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा

**जालना - प्रतिनिधी**

जिल्हा कौशल्य विकास,रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र,जालना आणिपोलिस अधीक्षक कार्यालय,जालना, यांचे संयुक्त विद्यामानाने दिनांक १५ जुलै, २०२६ रोजी बॅडमिंटन हॉल,पोलीस परेड ग्राउंड, जिल्हाधिकारी कार्यालय रोड, जालना, येथे सकाळी १०ते दुपारी ४वाजेपर्यंत ''पंडीत दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा'' आयोजितकरण्यातआलाआहे. यासाठीरिक्तपदे उपलब्ध आहेत.

यामेळाव्यातएचएससी, कोणतेही पदवीधर, आयटीआय ट्रेडधारक (फिटर, वेल्डर, इलेक्ट्रीशियन, फिल्ड असिस्टंट मॅनेजर, अप्रेन्टीस ट्रेनी, असिस्टंट ब्रांच मॅनेजर, ब्रांच ऑप्रेशनल मॅनेजर, संगणक ऑपरेटर,अप्रेंटिस, ड्रायव्हर, सेल्सएक्झिक्युटिव्ह, सर्व्हिस ॲडव्हायझरअसिस्टंट टेक्नीशियन, इत्यादी पात्रताधारक नोकरी इच्छूक उमेदवारासाठी एकूण ६४६ रिक्त पदे उपलब्ध असून मुलाखतीसाठी विविध १९ कंपन्यांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. त्यामध्ये भारत फायनान्शिअल सर्व्हिसेस लिमिटेड, जालना यांची ४० पदे,एनआरबी बेअरिंग्ज लिमिटेड, जालना., यांची ७० पदे, एल. जी. बालकृष्णन अँड ब्रदर्स प्रा. लि, जालनायांची २५ पदे,विक्रम टी प्रोसेसर प्रायव्हेट लिमिटेड, जालना यांची ६ पदे, कालिका स्टील अलॉयस लिमिटेड, जालनायांची १० पदे,भाग्यश्री रोलिंगमिल प्रा.लि., यांची २० पदे, लीलाई इलेक्ट्रिकल्स, जालनायांची०३पदे, श्री. माऊली मोटार ड्रायव्हिंग, जालनायांची०४पदे,अभिनव इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, जालनायांची७५पदे,आई इन्शुरन्स अँड इन्व्हेस्टमेंट सर्व्हिसेस, जालनायांची१०पदे, स्टेट बँक ऑफ इंडिया लाइफ इन्शुरेंस जालना यांची ७७ पदे,ॲक्सिस बँकजालना यांची १० पदे,कलश सीड्स, छत्रपती संभाजी नगरयांची २० पदे,टेक्नो क्राफ्ट फॉर्म वर्क लिमिटेड, छत्रपती संभाजी नगर यांची ९० पदे,गरवारे हायटेक लिमिटेड, छत्रपती संभाजी नगर यांची५० पदे,पोलिस अधीक्षक कार्यालय, जालना यांची ९० पदे,पोलीस ट्रेनिंग सेंटर, जालना यांची ११ पदे,देवगिरी नागरी सहकारी पतसंस्था, जालना यांची २०पदे व जालना हॉस्पिटल, जालना यांची १५पदे असून या मेळाव्यासाठी वरील१९ नामांकित कंपन्यांचे नियुक्ती अधिकारी प्रत्यक्ष उपस्थित राहणार असुन पात्र उमेदवारांच्या चाचणी व मुलाखती घेऊन विविध पदांच्या रिक्त जागांसाठी निवड व भरती करणार आहेत.

या सुवर्ण संधीचा रोजगार जास्तीत जास्त उमेदवारांनी लाभ घ्यावा आणि किमान पाच प्रतीत रिझ्युम/बायोडाटा, शैक्षणिक कागदपत्रे आणि आधारकार्ड/सेवायोजन नोंदणी छायाप्रतीसह सकाळी ०९ वाजता उपस्थितराहावे.नोकरी इच्छुक उमेदवारांनी अद्यापर्यंत सेवायोजन नोंदणी केली नसल्यास .... तसेच केंद्र शासनाच्या ...यासंकेतस्थळावर नोकरी साधक म्हणूननोंदणीकरावी. आपल्या होमपेजवरील हा पर्याय निवडा.जालना जिल्हा निवडा व फिल्टर बटनावर क्लिक करा.रोजगार मेळाव्यात सहभागी होण्यासाठी पंडित दीनदयाळ उपाध्याय रोजगार मेळावा - २ (२०२६-२७) या ओळीतील ॲक्शन मेनुतील दुस-या बटनावर क्लिक करा. हा पर्याय निवडा. पात्रतेनुसार मॅचिंग झालेल्या विविध कंपन्यांच्या रिक्त पदांना बटनावर (पान २ वर)

# जालन्यात महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन हिसकावणारे आरोपी जेरबंद; ३.२५ लाखांचा मुद्देमाल जप्त

**जालना - प्रतिनिधी**

शहरात महिलेच्या गळ्यातील सोन्याची चैन बळजबरीने हिसकावून जबरी चोरी करणाऱ्या आरोपींना स्थानिक गुन्हे शाखेने अवघ्या काही दिवसांत जेरबंद केले आहे. पोलिसांनी आरोपींकडून चोरी गेलेली चैन, गुन्ह्यात वापरलेली मोटरसायकल आणि मोबाईल असा एकूण ३,२५,५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक ०६/०७/२०२६ रोजी सायंकाळी ५:३० वाजण्याच्या सुमारास ६० वर्षीय गृहिणी सौ. अनिता गोपाल अवधुत (रा. शिक्षक कॉलनी, जालना) या मारवाडी गल्लीतून जात होत्या. दरम्यान, दोन अनोळखी मोटरसायकलस्वारांनी त्यांच्या गळ्यातील ०८ ग्रॅम वजनाची सोन्याची चैन बळजबरीने हिसकावून पळ काढला होता. याप्रकरणी पोलीस ठाणे सदर बाजार, जालना येथे गुन्हा नोंद (गु.रं.नं. ५६०/२०२६, कलम ३०४(२) भा.न्या.सं.) दाखल करण्यात आला होता. (पान २ वर)

# इस्त्रोची अंतरिक्ष विज्ञान वाहिनीला उत्स्फूर्त प्रतिसाद संस्कारचे विद्यार्थी अंतरिक्ष केंद्राची माहिती पाहून भारावले!

**जालना - प्रतिनिधी**

इस्त्रो या भारतीय अवकाश संशोधन केंद्र तसेच विज्ञान भारती यांच्या वतीने जालना जिल्ह्यातील सुजाण पालक तसेच विद्यार्थ्यांना इस्त्रोने केलेल्या आतापर्यंतच्या वेगवेगळ्या संशोधनाची माहिती व्हावी म्हणून प्रथमच एक स्वतंत्र विज्ञान वाहिनी शहरातील मुक्तेश्वर हिरवळीवर दाखल झालेली आहे. इस्त्रोच्या स्पेस ऑन व्हील्स उपक्रमास शहरातील संस्कार प्रबोधिनी विद्यालय यासह जुन्या जालन्यातील बारा शाळा,आणि गुरुकुलातील विद्यार्थ्यांनी भेट देऊन माहिती जाणून घेतली. अनेक महत्त्वाच्या आणि देशाच्या दृष्टीने लक्षणीय ठरलेल्या उपक्रमाची माहिती स्वयंसेवकांनी विद्यार्थ्यांना दिली.विद्यार्थी माहिती जाणून अक्षरशः भारावले होते.




या प्रदर्शनाची आकर्षण म्हणजे भारताची महत्त्वाकांक्षी गगनयान, चंद्रयान,भारतीय अंतरिक्ष केंद्र यांच्या प्रतिकृती मराठवाड्यातील विद्यार्थ्यांना पहिल्यांदाच पाहायला मिळत आहे त्याच प्रमाणे विविध उपग्रहाची माहिती ध्वनिफितीच्या माध्यमातून इस्त्रोच्या कामाचा आढावा विद्यार्थ्यांनी (पान २ वर)

# मनरेगा कुशल देयकांसाठी वलखेड येथील शेतकऱ्यांचा परतूर तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरु

## प्रशासकीय दिरंगाई आणि भेदभावामुळे १० शेतकरी संतप्त

**परतूर - प्रतिनिधी**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत (मनरेगा) सिंचन विहिरीचे काम पूर्ण करूनही गेल्या दीड वर्षांपासून हक्काचे कुशल देयक () न मिळाल्याने तालुक्यातील वलखेड येथील १० लाभार्थी शेतकरी अत्यंत आक्रमक झाले आहेत. प्रशासनाकडून होत असलेली टाळाटाळ आणि कथित पक्षपातीपणाच्या निषेधार्थ या शेतकऱ्यांनी ११ जुलै २०२६ पासून परतूर तहसील कार्यालयासमोर आमरण उपोषण सुरू केले आहे. प्रशासनाला १० जुलैपर्यंत दिलेली लेखी उत्तराची मुदत संपल्याने शेतकऱ्यांनी हे उपोषनाचे पाऊल उचलले आहे. दीड वर्षांपासून हक्काच्या पैशांसाठी वनवन

वलखेड येथील एकूण १० मनरेगा लाभार्थी शेतकऱ्यांनी वर्ष २०२३-२०२४ मध्ये सिंचन विहिरीसाठी प्रस्ताव दाखल केला होता. प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर त्यांना कार्यारंभ आदेश मिळाला. शेतकऱ्यांनी अत्यंत कष्टाने आणि पदरचे पैसे लावून विहिरीचे काम पूर्ण केले. त्यानंतर १० नोव्हेंबर २०२४ रोजीच कामाची कुशल देयके ग्रामपंचायत वलखेड येथील ग्राम रोजगार सेवकांकडे जमा केली. ग्रामपंचायत स्तरावरील तांत्रिक प्रक्रिया पूर्ण होऊन, तांत्रिक अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष कामाची पाहणी करत एम.बी. (..) नोंदवून काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्रही स्वाक्षरी करून दिले. ही सर्व देयके २७ जानेवारी २०२५ रोजी पुढील मंजुरीसाठी पंचायत समिती परतूर येथे सादर करण्यात आली होती.




**तांत्रिक घोळ की जाणीवपूर्वक दिरंगाई?**

शेतकऱ्यांनी दिलेल्या तक्रारीनुसार, ही सर्व देयके ऑनलाईन करण्यात आली होती आणि त्याचा ( ) करून पुढे पाठवण्यात आला होता. (पान २ वर)

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६**, E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.